**वि.दि.दा.क्र. ९/२०१९**
**CNRNO.MHOS120003502019**
**सरस्वती वि. मधुकर**
**नि.क्र. ५५ खालील आदेश**
**(आदेश दि.१२/०३/२०२४)**

१. प्रतिवादी क्र.२ ने प्रस्तुतचा अर्ज कागदपत्र म्हणजेच वादींनी प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे वडील यांच्या नावे करुन दिलेले संमतीपत्र दाखल करुन घेण्याकरिता दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तावित कागद हा प्रस्तुत दाव्याच्या अनुषंगाने महत्वाचा कागद असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले नाही.

३. प्रस्तुतचा दावा हा वादीच्या पुढील पुराव्यासाठी आहे. प्रस्तावित कागद हा अस्सल स्वरुपातील असुन तो दाव्यातील पक्षकारांच्या दरम्यानचा कागद असल्याचे व तसेच सदरच्या कागदपत्रांमध्ये दाव्यातील मिळकतींचा उल्लेख असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. अशा परिस्थीतीत प्रस्तावित कागद दाखल करण्याची परवानगी प्रतिवादीला देणे न्यायोचित वाटते. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण वादीस त्याच्या चालु असलेल्या पुराव्याच्या टप्प्यावर प्रस्तावित कागदपत्राबाबतीत पुरावा सादर करण्याची मुभा राहणार आहे. तसेच, त्या कागदपत्राबाबत प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची देखील मुभा राहणार आहे. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रतिवादी यासंनी सोसण्याचा आहे.

स्वा/-१२.०३.२०२४

दिनांक – १२/०३/२०२४

(श्री. ए. पी. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 12/03/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 12/03/2024 |
| Order uploaded on | --- | 12/03/2024 |